**नि.क्र. ३०/क पुढे सुरु....**

**अर्जदारातर्फे साक्षीदार श्री. सदाशिव धोंडीराम गोनुगडे यांचा पुढील सरतपास वकील श्रीमती तेजस्विनी कोळी यांचेतर्फे शपथेवर सुरू:–**

१८. मी माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्र. ३० वर दाखल केले असुन त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, मी संपादीत जागेचा नकाशा व मुल्यांकन अहवाल दाखल केला असून त्यास **निशाणी क्र. ३३ व ३४** देण्यात येते.

**उलटतपास सामनेवाला तर्फे जिल्हा सरकारी वकील श्री. वाय. एस. भोपी यांचे मार्फत सुरू:–**

१९. मी १९७८ पासून पनवेल येथे राहत आहे. मी संपादीत जागेची प्रत्यक्ष पाहणी केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, संपादीत जमिनीच्या पश्चिम बाजूला उभा डोंगर आहे. हे म्हणणे खरे नाही की, संपादीत जमिनीच्या पूर्व बाजूला उरण–मोरा रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, रस्त्याच्या पूर्व बाजूला दलदलीची जमिन आहे. हे म्हणणे खरे नाही की, दलदलीच्या जमिनीनंतर पूर्व बाजूला ५०० मी. अंतरावर भरतीच्या वेळी खारे पाणी येणारी पाणथळ जमिन आहे. संपादीत जमिनीमध्ये बोअरवेल घेतले असता ५० फूटापासून खारे पाणी लागते किंवा कसे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मुल्यांकन अहवाल तयार करताना संपादीत जमिनीच्या १९९२ सालचे पिक–पाणीचे उतारे पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, संपादीत जमिन ओसाड आहे. संपादीत जमिनीच्या आजूबाजूला कालवा किंवा धरण नाही. सदर ठिकाणी कालवा किंवा धरण नसल्याने संपादीत जमिनीमधून २ वेळा

उत्पादन घेतले जाते हे मला माहित नाही. संपादीत जमिनीच्या पूर्व बाजूला नौदलाची जमिनीचे प्रतिबंधीत नाही. (साक्षीदार स्वतःहून सांगतो की, सदर क्षेत्र संपादीत जमिनीला लागून नाही.) १९९२ सालापासूनच्या जमिन व्यवहाराची व विकासकामांची मला माहिती आहे. नागराजशेठ विरूद्ध महाराष्ट्र शासन या जनहित याचिकेमध्ये मा. उच्च न्यायालयाने संपादीत जमिनीचे बाजूला असलेल्या निवासी इमारत सोडण्याचे आदेश दिले हे मला माहित नाही. १९९२ साली संपादीत जमिनीच्या आजूबाजूला रेल्वेने प्रवासी वाहतूक केली जात नव्हती.

२०. हे म्हणणे खरे नाही की, बोरीपाखाडी येथे ग्रॅडवेल नॉर्टन, इंडस्ट्रिअल ॲब्रीवेज, ओ.एन.जी.सी. हे तीन कंपन्या सोडल्यास इतर औद्योगिक कारखाने नव्हते. संपादीत जमिनीपासून जवळची औद्योगिक वसाहत ही पाताळगंगा व तळोजा येथील आहे.

२१. हे म्हणणे खरे नाही की, संपादनाच्या वेळी एन.एच. ४बी अस्तित्वता नव्हता. त्याबाबतचे कागदपत्र सादर करणेस तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, संपादीत जमिनीच्या आजूबाजूला (आर.झोन नव्हता.) संपादीत जागेच्या आजूबाजूला नेव्हीचे प्रतिबंधीत क्षेत्र असल्याने निवासी बांधकामासाठी आराखडा किंवा बांधकाम परवानगी दिली जात नाही किंवा कसे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, संपादीत जमिनीच्या लागून निवासी इमारत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, उरण त्यांच्या आजूबाजूचा विकास न्हावा–शेवा बंदर कार्यरत झाल्यानंतर झाला. हे म्हणणे खरे नाही की, द्रोणागिरी नोड

**नि.क्र. ३०/क पुढे सुरु....**

हा जे.एन.पी.टी. बंदराजवळ असल्याने त्याचा विकास झालेला असल्याने त्या जमिनीचे दर उरणपेक्षा जास्त आहेत. हे म्हणणे खरे नाही की, संपादीत जमिनीचा दर आणि द्रोणागिरी नोड येथील जमिनीच्या दरामध्ये तुलना होऊ शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या व्हॅल्युएशन रिपोर्टमध्ये संपादीत जमिनीचा दर हा अवास्तव व अवाजवी आहे. हे म्हणणे खरे नाही की, भूसंपादन अधिकारी यांनी दिलेला दर बरोबर नाही.

२२. हे म्हणणे खरे आहे की, सदरहू जमीन सिडकोकरिता संपादीत करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, सिडकोने संपादीत जमिनीच्या मोबदल्यात नुकसान भरपाईव्यतिरिक्त साडेबारा टक्केचा विकसित भुखंड दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, संपादीत जमिनीच्या आजुबाजुला दलदलीची जागा असुन त्यात मँग्रोवज आहेत.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

स्वाक्षरी/–

पनवेल (वैशाली हंगरगेकर)

दिनांक : १३/०१/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर

पनवेल–रायगड.